**जिल्हाधिकारी कार्यालय,जालना**
**प्रशासकीय इमारत,स.नं.488,रिंग रोड,जालना**

जा.क्र.2026/मशाका/जि.से.सो./प्र.क्र- दिनांक :03/08/2026

# जिल्हास्तरीय सेतू समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना मार्फत नवीन आपले सरकार सेवा केंद्र (Aaple Sarkar Seva Kendra) स्थापन करण्यासाठी जाहिरात

जालना जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागामध्ये 735 नवीन आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन करण्यासाठी पात्र व इच्छुक व्यक्तींकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

## 1) पात्रता निकष

अर्जदाराने खालील अटी पूर्ण करणे आवश्यक राहील.

1. किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे.
2. किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण असावा.
3. संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक राहील. MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्रास प्राधान्य देण्यात येईल.
4. संबंधित ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्राचा स्थानिक रहिवासी असावा.
5. आधार क्रमांक, पॅन, बँक खाते व आवश्यक ओळखपत्र उपलब्ध असावे.
6. नैतिक अध:पतन, आर्थिक फसवणूक किंवा सायबर गुन्ह्याबाबत दोषी ठरलेला नसावा.

| | |
|---|---|
| ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची सुरूवात | दिनांक- 06/08/2026 सकाळी 11.00 पासुन |
| ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची अंतिम मुदत | दिनांक- 20/08/2026 पर्यंत सायं. 5.00 वाजेपर्यंत. |
| अर्ज स्विकारण्याची पध्दती | **ऑनलाईन पध्दतीने करणे अनिवार्य** |
| **ऑनलाईन अर्ज करण्यासाठी लिंक** | https://asskjalna.recruitonline.in |

आपले सरकार सेवा केंद्रासाठी सविस्तर जाहिरात, आवश्यक पात्रता, अटी व शर्ती https://asskjalna.recruitonline.in व www.jalna.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

अर्जदारांना कोणत्याही टप्प्यावर वैयक्तिक पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. त्यामुळे अर्जदारांनी वेळोवेळी https://asskjalna.recruitonline.in व www.jalna.gov.in या संकेतस्थळांना भेट देऊन अद्ययावत माहिती प्राप्त करावी.

**आपले सरकार सेवा केंद्र मंजुरी, निवड प्रक्रिया, केंद्रांचे वाटप तसेच संबंधित सर्व बाबींमध्ये अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतू समिती, जालना यांचेकडे राखीव राहतील.**

स्थळ : जालना
दिनांक : 03 / 08 / 2026

(आशिमा मित्तल)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हास्तरीय सेतू समिती, जालना**

Scanned with OKEN Scanner

## "आपले सरकार सेवा केंद्र" मिळणेकामीच्या अटी व शर्ती

### 1) किमान पात्रता:

अर्जदाराने खालील अटी पूर्ण करणे आवश्यक राहील.

1. किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे.
2. किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण असावा.
3. संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक राहील. MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्रास प्राधान्य देण्यात येईल.
4. संबंधित ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्राचा स्थानिक रहिवासी असावा.
5. आधार क्रमांक, पॅन, बँक खाते व आवश्यक ओळखपत्र उपलब्ध असावे.
6. नैतिक अध:पतन, आर्थिक फसवणूक किंवा सायबर गुन्ह्याबाबत दोषी ठरलेला नसावा.

### 2) पायाभूत सुविधा: (अर्जाच्या छाननीनंतर या कार्यालयाकडून प्रत्यक्ष पाहाणी करण्यात येईल.)

प्रत्येक सेवा केंद्रामध्ये किमान खालील सुविधा असणे आवश्यक राहील.

- किमान 100 चौ. फुट कार्यालयीन जागा
- दोन संगणक/लॅपटॉप
- लेझर प्रिंटर
- स्कॅनर
- बायोमेट्रिक उपकरण
- वेबकॅम
- युपीएस अथवा पर्यायी वीज बॅकअप
- ब्रॉडबँड इंटरनेट (Minimum ग्रामीण 10 mbps नागरी 20 mbps)
- सीसीटीव्ही व्यवस्था
- नागरिकांसाठी प्रतीक्षाकक्ष
- शासनप्राधिकृत सेवा शुल्क दर्शविणारा फलक व बाह्य नामफलक

### 3) मुलाखत:

- जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत अर्जदारांची संरचित मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीमध्ये खालील बाबींचे मूल्यांकन करण्यात येईल.
- शासकीय सेवांचे ज्ञान
- नागरिकाभिमुख सेवावृत्ती
- डिजिटल प्रणाली हाताळण्याची क्षमता
- समस्या सोडवण्याची क्षमता
- संवाद कौशल्य
- प्रामाणिकपणा व नैतिकता
- माहिती गोपनीयता व डेटा सुरक्षा याबाबत जागरूकता

### 4) निवड प्रक्रिया:

1. अर्जाची प्राथमिक छाननी व पडताळणी.
2. गुणांकनाच्या आधारे कागदपत्रांचे परीक्षण.
3. प्रस्तावित कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी.

Scanned with OKEN Scanner

4. पोलीस पडताळणी.
5. जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत संरचित मुलाखत.
6. 100 गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (Merit List) तयार करणे.
7. प्राथमिक निवड यादी प्रसिद्ध करून हरकती मागविणे.
8. अंतिम निवड व नियुक्ती आदेश देणे.
9. अनिवार्य प्रशिक्षण व ६ महिन्यांचा परिविक्षाधिन कालावधी
10. समाधानकारक कार्यप्रदर्शनानंतर नियमित मान्यता.

**5) कार्यप्रदर्शनावर आधारित करार नुतनीकरण:**

- निवड झालेल्या VLE ला प्रारंभी 3 वर्षाचा करार देण्यात येईल. पुढील नुतनीकरण खालील कार्यप्रदर्शन निर्देशकांच्या आधारे करण्यात येईल.
- केलेल्या व्यवहारांची संख्या
- नागरिक समाधान निर्देशांक
- सेवा देण्यास लागणारा सरासरी कालावधी
- प्राप्त तक्रारींची संख्या व त्यांचे निराकरण
- लेखापरिक्षणातील अनुपालन
- प्रणालीची कार्यक्षमता (System uptime)
- आर्थिक शिस्त
- शासनाच्या विविध मोहिमांमध्ये सहभाग

**6) अपात्रता निकष:**

खालील परिस्थितीत अर्जदारास अपात्र ठरवण्यात यावे.

- खोटी किंवा बनावट कागदपत्रे सादर करणे.
- कोणत्याही शासकीय योजनेतून काळ्या यादीत समाविष्ट असणे.
- आर्थिक फसवणूक अथवा सायबर गुन्ह्यांची प्रलंबित गंभीर प्रकरणे असणे.

(मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेनुसार)

**(आशिमा मित्तल)**
**अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समिती,**
**तथा जिल्हाधिकारी, जालना**

Scanned with OKEN Scanner

भाग २: सविस्तर जाहिरात दस्तऐवज

## 1) निवड प्रक्रिया (Selection Process):
## "आपले सरकार सेवा केंद्र" मंजूर करण्यासाठीचे निकष

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत सेतू प्रभारी अधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे संयुक्तरीत्या अर्जाची छाननी पार पाडतील. तसेच दि.23/08/2002 च्या शासन निर्णयान्वये स्थापित केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सेतू समिती समोर सदर प्रस्ताव ठेवून आपले सरकार सेवा केंद्र देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी त्या-त्या भौगोलिक क्षेत्रात एकापेक्षा जास्त पात्र अर्ज प्राप्त झाल्यास खालीलप्रमाणे प्रक्रिया राबवून गुणांकन करण्यात येईल.

समितीव्दारे खालीलप्रमाणे गुणांकनाची व मुलाखतीची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. तसेच सदर समितीचा निर्णय अंतिम असेल.

**सदर निवड प्रक्रियेमध्ये 100 गुण निर्धारीत करण्यात येतील व गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल:-**

1. **गुणांकनावर आधारित निवड निकष (एकुण 100 गुण) (सोबत सविस्तर विवरण जोडले आहे)**

| निकष | गुण | मूल्यांकनाचे निकष |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | 10 | किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण; पदवी, पदविका किंवा व्यावसायिक पात्रतेस अतिरिक्त गुण (किमान शैक्षणिक अहर्ता असल्यास 5 गुण, पदवी असल्यास 2 अतिरिक्त गुण, पदव्युत्तर असल्यास 3 अतिरिक्त गुण) |
| संगणक व डिजिटल साक्षरता | 15 | MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र, संगणक हाताळणी, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, सायबर सुरक्षा यांचे ज्ञान |
| पायाभूत सुविधा | 15 | स्वतंत्र कार्यालय, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरण, इंटरनेट, वीज बॅकअप, सीसीटीव्ही, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ प्रवेश |
| आर्थिक क्षमता | 10 | आवश्यक गुंतवणूक करण्याची व किमान 6 ते 12 महिने व्यवसाय चालविण्याची आर्थिक क्षमता |
| ग्राहक सेवा व संवाद कौशल्य (मुलाखतीद्वारे) | 20 | संवाद कौशल्य, तक्रार निवारण क्षमता, प्रामाणिकपणा व नागरिकाभिमुख दृष्टिकोन |
| अनुभव | 10 | सीएससी, महा-ई-सेवा केंद्र, बँकिंग प्रतिनिधी, ई-गव्हर्नन्स किंवा तत्सम क्षेत्रातील अनुभव |
| व्यवसाय आराखडा व शाश्वतता | 05 | सेवा विस्तार, जनजागृती, आर्थिक व्यवहार्यता आणि व्यवसाय नियोजन |
| सामाजिक समावेशकता | 05 | शासनाच्या धोरणानुसार दिव्यांग, माजी सैनिक, महिला, स्वयंसहाय्यता गट सदस्य किंवा स्थानिक उद्योजकांना प्राधान्य |
| चारित्र्य पडताळणी | 10 | पोलीस पडताळणी, फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार किंवा शासकीय काळ्या यादीत नसणे |
| **एकूण गुण** | 100 | |

(आशिमा मित्तल)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समिती,
तथा जिल्हाधिकारी, जालना

Scanned with OKEN Scanner

**सदर निवड प्रक्रियेमध्ये 100 गुण निर्धारीत करण्यात येतील तर गुणांची सविस्तर विभागणी खालीलप्रमाणे असेल**

### 1. शैक्षणिक पात्रता (10 गुण) (शै.अर्हता प्रमाणपत्र अपलोड करावे)

| अ.क्र. | मूल्यांकनाचे निकष | गुण |
|---|---|---|
| 1 | किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण; पदवी, पदविका किंवा व्यावसायिक पात्रतेस अतिरिक्त गुण (किमान शैक्षणिक अहर्ता असल्यास 5 गुण, पदवी असल्यास 2 अतिरिक्त गुण, पदव्युत्तर असल्यास 3 अतिरिक्त गुण) | 12 (HSC) उत्तीर्ण – 5 गुण |
| | | पदवी- 2 गुण |
| | | पदव्युत्तर पदवी- 3 गुण |
| | **एकुण** | **10** |

### 2. संगणक व डिजिटल साक्षरता (15 गुण) (प्रमाणपत्र अपलोड करावे)

| अ.क्र. | सुविधा | गुण |
|---|---|---|
| 1 | MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र (CCC) | 13 |
| 2 | सायबर सुरक्षा यांचे ज्ञान असल्याबाबत प्रमाणपत्र | 2 |
| | **एकुण** | **15** |

### 3. पायाभूत सुविधा (15 गुण)

**तपासणी पथकाने मानक तपासणी यादीचा वापर करावा. (प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येईल)**

| अ.क्र. | सुविधा | गुण |
|---|---|---|
| 1 | किमान 100 चौ. फूट कार्यालय | 2 |
| 2 | दोन संगणक/लॅपटॉप | 2 |
| 3 | लेझर प्रिंटर | 1 |
| 4 | स्कॅनर | 1 |
| 5 | बायोमेट्रिक उपकरण | 2 |
| 6 | वेबकॅम | 1 |
| 7 | UPS/वीज बॅकअप | 1 |
| 8 | ब्रॉडबैंड इंटरनेट (ग्रामीण 10 mbps नागरी 20 mbps) | 2 |
| 9 | CCTV | 1 |
| 10 | नागरिकांसाठी प्रतीक्षा व्यवस्था व सूचना फलक | 1 |
| 11 | शासनप्राधिकृत सेवा शुल्क दर्शविणारा फलक व बाह्य नामफलक | 1 |
| | **एकुण** | **15** |

Scanned with OKEN Scanner

## 4. आर्थिक क्षमता (10 गुण) (अपलोड करावे)

| अ.क्र. | पुरावा | गुण |
|---|---|---|
| 1 | गुंतवणुकीसाठी पुरेशी बँक शिल्लक 6 महिन्याचे बँक स्टेटमेंट | 3 |
| 2 | कर्ज मंजुरी/OD/वर्किंग कॅपिटल | 2 |
| 3 | मागील दोन वर्षांचे आयकर विवरणपत्र | 2 |
| 4 | NPA/कर्ज थकबाकी नसणे | 2 |
| 5 | आर्थिक शाश्वततेचे स्वयंघोषणापत्र | 1 |
| | **एकुण** | **10** |

## 5. ग्राहक सेवा व संवाद कौशल्य (मुलाखतीद्वारे) (20 गुण)

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1 | संवाद कौशल्य | 4 |
| 2 | नागरिकाभिमुखता | 4 |
| 3 | समस्या सोडविण्याची क्षमता | 3 |
| 4 | प्रामाणिकपणा व नैतिकता | 3 |
| 5 | शासकीय सेवांचे ज्ञान | 3 |
| 6 | आत्मविश्वास व व्यावसायिकता | 3 |
| | **एकुण** | **20** |

## 6. अनुभव (10 गुण) (प्रमाणपत्र अपलोड करावे)

| अ.क्र. | अनुभव | | गुण |
|---|---|---|---|
| 1 | CSC ऑपरेटर, महा-ई-सेवा केंद्र बँकिंग प्रतिनिधी (BC), ई-गव्हर्नन्स प्रकल्प, शासकीय सेवा केंद्र/कराराचा अनुभव | एक अनुभव असल्यास | 5 |
| 2 | | एकापेक्षा जास्त अनुभव असल्यास | 10 |
| | **एकुण** | | **10** |

## 7. व्यवसाय आराखडा (5 गुण) (फॉर्म भरतेवेळी अपलोड करावा)

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1 | नागरिकांपर्यंत पोहोच | 1 |
| 2 | आर्थिक व्यवहार्यता | 1 |
| 3 | विस्तार योजना | 1 |
| 4 | जनजागृती कार्यक्रम | 1 |
| 5 | नाविन्यपूर्ण कल्पना | 1 |
| | **एकुण** | **5** |

Scanned with OKEN Scanner

## 8. सामाजिक समावेशकता (5 गुण) (आवश्यक प्रमाणपत्र अपलोड करावे)

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1 | महिला | 5 |
| 2 | माजी सैनिक | 5 |
| 3 | दिव्यांग | 5 |
| 4 | स्वयं-सहाय्यता बचत गट सदस्य/ स्थानिक उद्योजक | 5 |
| | **एकुण** | 5 |

## 9. चारित्र्य पडताळणी (10 गुण) (फॉर्म भरतेवेळी सदर प्रमाणपत्र अपलोड करावे)

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1 | पोलीस पडताळणी, फौजदारी दोषसिद्धी नसणे आर्थिक फसवणुकीचा इतिहास नसणे | 8 |
| 2 | 'शासकीय काळ्या यादीत (Blacklisted) नसणे | 2 |
| | **एकुण** | 10 |

(आशिमा मित्तल)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समिती,
तथा जिल्हाधिकारी, जालना

Scanned with OKEN Scanner

# "आपले सरकार सेवा केंद्र" मिळणेकामीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

1. महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या आपले सरकार सेवा केंद्राबाबतचे 1. शासन निर्णय क्र. मातंस-1716/प्र. क्र.517/39 दिनांक 19 जानेवारी 2018. 2. शासन निर्णय क्रमाक-आसेकें-1725/प्र.क्र.86/मातं (39) दिनांक 27 मार्च 2025. 3. शासन शुध्दिपत्रक क्रमांक: आसेकें-2026/प्र.क्र.98/TECH-1 (E-1742666) दिनांक: 09 जुलै, 2026 च्या शासन निर्णयाला अधिन राहुन केंद्राची नियुक्ती व कार्यान्वित केल्या जाईल. तसेच वरीलप्रमाणे शासन निर्णय व शासन शुद्धीपत्रकामधील अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारास अनिवार्य राहील.त्याचा भंग केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता केंद्र बंद करण्यात येईल.
2. उमेदवार हा गुंतवणूकीचे द्युष्टीकोनातून सक्षम असावा. आवश्यक गुंतवणूक करण्याची व किमान 6 ते 12 महिने व्यवसाय चालविण्याची आर्थिक क्षमता असावी.
3. अर्जदाराकडे स्वतःचे/Rented किमान 100 चौ.फुटाचे स्वतंत्र कार्यालय, दोन संगणक/लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरण, इंटरनेट, वीज बॅकअप, सीसीटीव्ही, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ प्रवेश सुविधा असणे आवश्यक आहे.
4. **शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार केंद्र चालू ठेवणे, शासनाने ठरवून दिलेले दरपत्रक केंद्रावर दर्शनी भागात प्रसिध्द करणे, तसेच ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक शुल्काची आकारणी न करणे, शासनाने पुरविलेल्या आज्ञावलीचा (software) इ. योग्य वापर, संरक्षण, व जतन करणे अर्जदारांना बंधनकारक राहील. तसेच नागरीकांसाठी बसण्याची सोय तथा आवश्यक सर्व बाबींची पूर्तता करावी लागेल.**
5. **संबंधित अर्जदार यांना जिल्हयामध्ये (शहारी/ग्रामीण भागात) फक्त एकाच ठिकाणी नव्याने आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करता येईल.**
6. **अर्जदार यांना अर्ज भरण्याबाबत काही अडचणी असल्यास त्यांनी Helpdesk No.7798080674 वर संपर्क साधुन अधिक माहिती प्राप्त करुन घ्यावी.**
7. आपले सरकार सेवा केंद्राना शासनाने तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाने तसेच उपविभागीय अधिकारी व तहसिलदार व इतर कार्यालय प्रमुख यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे/निर्देशांचे पालन करावे लागेल. तसेच त्यांनी केंद्राबाबत मागीतलेले अहवाल तात्काळ सादर करावे लागतील.
8. शासन निर्णयानुसार ठरवुन दिलेल्या सर्व सेवा आपले सरकार सेवा केंद्रातुन विहित शुल्कात देणे अनिवार्य राहील. याबाबत नागरीकांकडुन तक्रारी प्राप्त झाल्यास, सदर विषयी उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांचेमार्फत गंभीर दखल घेण्यात येईल व चौकशी करून कारवाई करण्यात येईल.
9. निर्गत केलेल्या दाखल्याच्या / प्रमाणपत्राच्या स्थळप्रती संबंधित उपविभागीय अधिकारी/ तहसिल कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील.
10. **अर्जामध्ये भरलेली माहिती चूकीची आढळल्यास त्यांचा अर्ज रद्द करण्यात येईल.**
11. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांनी नियुक्त केलेले तांत्रीक अधिकारी हे आपले सरकार सेवा केंद्राची संपुर्ण चौकशी करू शकतील.
12. मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, शुल्क कागदपत्रांच्या आधारे परिपुर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी नविन आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल.
13. **केंद्र व राज्य शासनाचे शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक उपक्रमे/महामंडळे स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच यांना तसेच शासकीय सेवांमध्ये कार्यरत असणा-या अधिकारी/कर्मचारी यांना आपले सरकार सेवा केंद्राकरिता अर्ज करता येणार नाही. (आपले सस्कार सेवा केंद्रा करिता अर्ज प्रक्रियेत ग्रामपंचायत मधील रुजु असलेले केंद्र चालक या प्रक्रियेसाठी अपात्र असतील.)**
14. अंतिम पात्र झालेल्या उमेदवारांना सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्र 1 महिन्यात सुरु करून, अहवाल सेतु समिती कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. (शासन नियमानुसार केंद्र स्थापन केल्याबाबत जि.पी.एस. एनॅबल्ड फोटो सादर करणे बंधनकारक आहे.)

Scanned with OKEN Scanner

15. अर्जदार हा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. अशी बाब निदर्शनास आल्यास, कोणत्याही स्तरावर अर्जदारास अपात्र करण्यात येईल.
16. **आपले सरकार सेवा केंद्र वाटपाबाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतु समिती, जालना यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील. याबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.**
17. जालना जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रांच्या जाहिरातीबाबत सर्व माहिती वेळोवेळी जिल्हयाचे संकेतस्थळ www.jalna.gov.in व https://asskjalna.recruitonline.in/ वर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याकरीता या कार्यालयाशी संपर्क साधण्याची आवश्यकता नाही.
18. **प्राप्त अर्जापैकी कोणता अर्ज स्वीकारायचा, कोणता अर्ज नाकारायचा किंवा संपूर्ण प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार मा. अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतू समिती, (जिल्हा ई-गर्व्हनन्स सोसायटी), तथा जिल्हाधिकारी, जालना यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहे.**
19. **अर्जदारास मंजुर करण्यात आलेल्या ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र चालविणे बंधनकारक असेल. मंजुर करण्यात आलेल्या ठिकाणी केंद्र चालवित नसल्यास अथवा दुस-या ठिकाणी चालवित असल्याचे आढळून आल्यास संबंधीत केंद्र कायमस्वरूपी बंद करण्यात येईल.**
20. **अर्जदारास आपले सरकार सेवा केंद्र मंजुर झाल्यानंतर अर्जदारांनी 03 महिन्याच्या कालावधीमध्ये एकही व्यवहार न केल्यास त्यांना मंजुर करण्यात आलेले केंद्र रद्द करण्यात येईल. तसेच कोणत्याही परिस्थितीमध्ये पुन्हा केंद्र चालु होणार नाही.**
21. **अर्जदारास कोणत्याही प्रक्रियेबाबत वैयक्तीक पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

**ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत :-**

1. Online अर्ज करणे प्रक्रीयेची थोडक्यात पद्धती खालील प्रमाणे आहे. (विस्तृत माहितीसाठी संकेतस्थळावरील 'अर्ज कसा भरावा' पहावे.)
2. प्रस्तुत आपले सरकार सेवा केंद्र वाटपाकरीता फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.
3. **उमेदवाराला ऑनलाईन अर्ज https://asskjalna.recruitonline.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील.** ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळा वरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.
4. अर्जदार यांनी सदर संकेतस्थळावर प्रथम लॉगिन आयडी व पासवर्ड तयार करुन जतन करुन ठेवावा. अर्जदार यांनी फॉम भरताना गावाचे नाव, विस्त्रृत जाहिरातीत सदर गावात आपले सरकार सेवा केंद्र स्थापना करण्याकरीता सदर गावाचे नाव समाविष्ट आहे काय? याची खात्री करून अर्ज भरावे. अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.
5. प्रत्यक्ष अर्ज भरण्यापूर्वी विस्तृत जाहिरातीचे वाचन करुन त्यातील अटी व शर्ती पडताळून पहाव्यात. सदर विस्तृत जाहिरात www.jalna.gov.in व https://asskjalna.recruitonline.in/ वर उपलब्ध आहे.
6. https://asskjalna.recruitonline.in/ या संकेतस्थळावर **'अर्ज करा** या Link वर click करावे. यानंतर संबंधीत पदासाठीचा अर्ज दिसून येईल.
7. यानंतर सर्व रकान्यामध्ये आपली माहिती व्यवस्थित भरावी.
8. उमेदवाराने त्याचा Photo व सही संकेतस्थळावर दिलेल्या तपशीलानुसार Upload करावा. (उमेदवाराने लगतच्या सहा महिन्याच्या कालावधीतील फोटो Upload करावा.)
9. सर्व माहिती भरल्यानंतर continue वर click करावे. यामुळे भरलेल्या अर्जाचे पूनर्वलोकन (Review) करता येईल. तर अर्जातील माहिती बदलावयाची असल्यास edit form वर click करावे.
10. पूर्नविलोकनात (Review) सर्व माहिती बरोबर असल्यास Save and Continue वर click करावे.
11. यामूळे अर्जदाराने भरलेली माहिती संकेतस्थळावर Save होईल. उमेदवाराचा Form ID तयार होईल.
12. तयार झालेला Form ID आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या संपूर्ण प्रक्रीयेत उपयुक्त असल्याने तो उमेदवारांनी सांभाळून ठेवावा.

Scanned with OKEN Scanner

13. यानंतर उमेदवार आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या प्रक्रियेकरीता प्रक्रीया शुल्क रू.550/- (ना परतावा) ऑनलाईन पध्दतीने UPI- PhonePe, GPay etc. इत्यादीव्दारे QR Code स्कॅन करुन भरणे आवश्यक राहील. तसेच भरणा केलेल्या शुल्काचा फोटो ऑनलाईन Upload करावा.
14. ऑनलाईन प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर (Approve by Authority) उमेदवारास अर्जाची Print काढता येईल.
15. विहीत वेळेनंतर संकेतस्थळावरून अर्ज भरण्याची प्रक्रीया काढून टाकण्यात येईल.
16. उमेदवाराने संकेतस्थळावर नोंदणी करताना दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर (Mobile No.) आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या प्रक्रिये संदर्भात आवश्यक त्या सुचना एस.एम.एस व्दारे दिल्या जातील.
17. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपुर्ण भरलेल्या उमेदवाराची स्थिती/ वेळापत्रक/ मुलाखतीची तारीख इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल. जर उमदेवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण किंवा मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या प्रक्रीयेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच मोबाईल वहनात येणा-या तांत्रिक अडचणीना हे कार्यालय जबाबदार असणार नाही यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या प्रक्रीयेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
18. उमेदवाराने भरलेल्या माहिती आधारे व शासन निर्णय दि.09 जूलै 2026 चे मधील गुणांकनानुसार त्यास मुलाखतीकरीता पात्र करण्यात येईल. तेव्हा अर्जदाराने Online अर्ज भरताना त्यांच्या पात्रतेनुसार अचूक, परिपुर्ण व खरी माहिती भरावी.
19. Online अर्जासोबत कोणेतही अनावश्यक प्रमाणपत्रे अथवा कागदपत्रे जोडू (upload) नयेत.
20. उमेदवाराची ऑनलाईन अर्जात (जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रतेनुसार) कागदपत्रे (upload) केलेली आहे असे गृहित धरून पुर्वतपासणी / छाननी न करता गुणांकन केले जाणार असल्यामुळे, पात्र उमेदवाराला मिळालेल्या गुणांच्या आधारे, उमेदवाराला आपले सरकार सेवा केंद्र मंजूर झाल्याबाबत कोणतेही हक्क सांगता येणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन, मुळ कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. व तदनंतरच उमेदवारास प्रत्यक्ष मुलाखतीस पात्र करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारास आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे अधिकार अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
21. ऑनलाईन अर्ज भरतेवेळी उमेदवारांची जोडेलेल्या प्रमाणपत्राआधारे मुलाखतीसाठी पात्र/अपात्र उमेदवाराची यादी जालना जिल्हयाचे अधिकृत संकेतस्थळावर www.jalna.gov.in व https://asskjalna.recruitonline.in या संकेतस्थळावर पसिध्द करण्यात येईल.
22. उमेदवाराचे ऑनलाईन अर्ज भरतेवेळी जोडलेल्या (upload) केलेल्या कागदपत्राआधारे (तात्पुरत्या गुणांकनाआधारे) उमेदवारास मुलाखतीस पात्र/अपात्र करण्यात येईल. मुलाखतीस पात्र उमेदवारास मुलाखतीस मुळ कागदपत्रासह उपस्थित राहाणे अनिवार्य राहील. अनुपस्थित राहिल्यास संबंधिताची उमेदवारी संपुष्टात येईल.
23. ऑनलाईन पध्दतीने अर्ज अपुर्णतेमुळे नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.
24. प्रस्तुत प्रक्रीया ही Online पध्दतीने असल्याने उमेदवाराने माहिती भरताना अचुक / खरी / जी कागदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत, अशीच माहिती भरावी. चुकीची / खोटी / दिशाभूल करणारी / अन्य इसमाची अथवा नंतर उशीराने कागदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध होणारी माहिती भरल्यास व भविष्यात निदर्शनास आल्यास अथवा अशा उमेदवाराची निवड झाल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल व शासनाची फसवणुक केल्या प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, यांची संबंधीतानी गांभिर्यपुर्वक नोंद घ्यावी.
25. **अर्जदार यांनी ऑनलाईन भरणा केलेले आपले सरकार सेवा केंद्र प्रक्रीया शुल्क रु.550/- कोणत्याही परिस्थतीत परत केले जाणार नाही.**
26. यापुढील सर्व माहिती जसे, पात्र/अपात्र उमेदवारांच्या याद्या; उमेदवारांची प्राप्त गुणांच्याआधारे यादी अंतिम निवड यादी इ. www.jalna.gov.in व https://asskjalna.recruitonline.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

Scanned with OKEN Scanner

27. **उमेदवाराने आपले सरकार सेवा केंद्र वाटपासंदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल. तसेच आपले सरकार सेवा केंद्र वाटप प्रक्रियेसंदर्भात अनूचित अथवा बेकायदेशीर कृत्य केल्यास संबंधितावर फौजदारी कारवाई करण्यात येईल.**
28. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे असणार नाही.
29. आपले सरकार सेवा केंद्र वाटपानुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्या अटी जशास तशा लागू राहतील.

**(आशिमा मित्तल)**
**अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समिती,**
तथा जिल्हाधिकारी जालना

प्रत -

1. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी यांना जालना जिल्ह्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
2. जिल्ह्य माहिती अधिकारी जालना यांना प्रमुख वृत्तपत्रात प्रेस नोट स्वरुपात प्रसिध्द करण्याकरीता.
3. उपविभागीय अधिकारी (सर्व) ------------------- यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
4. तहसिलदार (सर्व) ------------------------यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव. उपरोक्त जाहिरनामा तहसिल कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर तसेच संबंधीत ग्रामपंचायतच्या नोटिस बोर्डवर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.
5. जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटिस बोर्डवर प्रसिध्द करण्याकरीता.

Scanned with OKEN Scanner

## अर्ज तपासणीचे विविध टप्पे

1. अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या आधारे प्राथमिक छाननी करून पात्र/अपात्र ची स्थिती दिनांक 01/09/2026 रोजी सायंकाळी 5.00 वा. संबंधित अर्जदार यांचे लॉगीनमध्ये प्रसिध्द करण्यात येईल.
2. पायाभूत सुविधांचे अनुषंगाने, प्रस्तावित कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी, तपासणी पथकाद्वारे करण्यात येईल. (तपासणी बाबतचे वेळापत्रक स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.)
3. पायाभूत सुविधांचे अनुषंगाने तपासणी झाल्यानंतर पात्र/अपात्र यादी तसेच मुलाखतीचे व मुळ कागदपत्र तपासणी बाबतचे वेळापत्रक स्वतंत्रपणे www.jalna.gov.in व https://asskjalna.recruitonline.in प्रसिध्द करण्यात येईल.
4. 
5. जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत संरचित मुलाखत पुर्ण झाल्यावर, 100 गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (Merit List) प्रसिध्द करण्यात येईल.
6. प्राथमिक निवड यादी प्रसिद्ध झाल्यानंतर हरकती मागविण्यात येईल. याबाबत वेळापत्रक स्वतंत्रपणे www.jalna.gov.in व https://asskjalna.recruitonline.in प्रसिध्द करण्यात येईल.
7. प्राथमिक निवड यादी प्रसिद्ध झाल्यानंतर प्राप्त हरकतींवर निर्णय घेवून अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.

**(आशिमा मित्तल)**
**अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समिती,**
**तथा जिल्हाधिकारी, जालना**

Scanned with OKEN Scanner

**जिल्हाधिकारी कार्यालय,जालना**

दुरध्वनी क्र: (02482 225502)
मेल आयडी:rdcjalna@gmail.com

जा.क्र.2026/मशाका/जि.से.सो/कावी-
दिनांक : /08/2026

---

## आपले सरकार सेवा केंद्र जाहिरात-2026

**नवीन आपले सरकार सेवा केंद्र मिळणेकामी सर्व कागदपत्र ऑनलाईन अर्ज सादर करतांना अपलोड करणे आवश्यक आहे.**

1. आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करणारा नागरीक हा ज्या ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका क्षेत्राचा स्थानिक रहिवासी आहे. तेथील अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) किंवा रहिवासी प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
2. अर्जदाराचे वय किमान 18 वर्ष पूर्ण असावे. (टि.सी.ची प्रत अपलोड करावी)
3. आधार कार्ड, पॅनकार्ड, बँक खाते (मागील 6 महिन्याचे स्टेटमेंट) इ. कागदपत्र अपलोड करावे.
4. शैक्षणिक पात्रता किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण असावा. (बारावी, पदवी, पदव्युत्तर चे गुणपत्रक सोबत जोडावे.)
5. संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक राहील. MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र. (प्रमाणपत्र अपलोड करणे)
6. पोलीस पडताळणी, फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार किवा शासकीय काळ्या यादीत नसणे. प्रमाणपत्र फॉर्म भरतेवेळी आवश्यक आहे. (पोलीस चारीत्र्य प्रमाणपत्र: संबंधित पोलीस स्टेशनचे चालू महिन्याचे चारीत्र्य प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. **(चारीत्र्य प्रमाणपत्र नसेल तर चारीत्र्य प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची पोच पावती जोडावी)**
7. शासनाच्या धोरणानुसार दिव्यांग, माजी सैनिक, महिला, स्वयंसहाय्यता गट सदस्य किंवा स्थानिक उद्योजकांनी प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
8. जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे (घर कर पावती चालु वर्षाची अथवा रेशन कार्ड ग्रामपंचायतीचा न.न.8) घर स्वतःचे नसत्यास घरमालकाचे भाडेतत्वावरची कागदपत्रे (भाडेपत्र व घरमालकाचे चालु वर्षाची घरकर पावती)
9. अर्जदारास आपले सरकार सेवा केंद्र चालविण्यासाठीच्या नियोजीत जागेचे आतील व बाहेरील (GPS Map Camera) द्वारे काढलेले फोटो अपलोड करणे आवश्यक आहे.
10. **CSC, महा-ई-सेवा केंद्र, इन्शुरन्स बँकिंग प्रतिनिधी, ई-गव्हर्नन्स किंवा तत्सम क्षेत्रातील अनुभव असल्यास प्रमाणपत्र अपलोड करावे.**
11. बँकेचे पासबुकाची/ Statement (मागील ६ महिन्यांची व्यवहारांची) स्वयंसाक्षांकीत प्रत अपलोड करावी
12. अर्जदारांनी अर्ज शुल्क रक्कम रू.550/- **(ना परतावा)** जाहिरातीमधील क्यु.आर.कोडवर जमा करून अर्ज शुल्क भरणा केल्याची पावती ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करावी.
13. **अर्ज सादर करतांना अर्जदाराने आवश्यक सर्व कागदपत्र अर्जासोबत ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहिल, त्यानंतर अर्जदाराकडुन कुठलेही कागदपत्र स्विकारले जाणार नाहीत.**

**(आशिमा मित्तल)**
**अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समिती,**
**तथा जिल्हाधिकारी, जालना**

Scanned with OKEN Scanner

# प्रतिज्ञापत्र

मी श्री./श्रीमती-------------------------------------------------श्री.-----------------------------------------------
------------- यांचा मुलगा/मुलगी वय----------वर्ष, आधार क्र.------------------- रा.-------------------------------
---ता.-----------------------जि.-----------येथील रहिवाशी असुन,जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचेकडील -----
----------------- या संकेतस्थळावर नव्याने "**आपले सरकार सेवा केंद्र**" देणेकामी प्रसिध्द केलेल्या रिक्त केंद्राच्या यादीस अधीन राहुन, तसेच दिनांक----------------------रोजीच्या दैनिक -------------------------वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अधीन राहुन ग्रामपंचायत/नगर पंचायत/महानगर पालिका ------------------------------ जाहिरातीनुसार "**आपले सरकार सेवा केंद्र**" रिक्त गाव/झोन/वार्ड/परिसराचे नावः -------------------------------------
----ता.-------------------जि.जालना या ठिकाणी नवीन आपले सरकार सेवा केंद्र मिळणे कामी अर्ज सादर करीत आहे. तसेच याद्वारे घोषीत करतो/करते की, वरील सर्व माहिती खरी आहे. मी कोणत्याही 'शासकीय काळ्या यादीत (Blacklisted) समाविष्ट नाही तसेच माझ्यावर कोणत्याही प्रकारची फौजदारी कारवाई झाली नसुन, माझ्यावर आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झालेला नाही. अर्जासोबत जोडलेले सर्व कागदपत्रे खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा कागदपत्रे खोटे असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पुर्ण जाणिव आहे. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतु सोसायटी जालना यांचा निर्णय अंतिम राहील व तो मला मान्य राहील. याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे मी पालन करील. तसेच आपले सरकार सेवा केंद्राबाबत कार्यालयाने/शासनाने ठरविलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य राहतील.

ठिकाण-

दिनांक-

करिता मी आज दिनांक / /2026 रोजी स्वत : चे स्वाक्षरीने प्रतिज्ञापत्र सादर करीत आहे.

अर्जदार

स्वाक्षरी ----------------------------------------

नाव -------------------------------------------

पत्ता ------------------------------------------

दिनांक ----------------------------------------

Scanned with OKEN Scanner